प्रसिध्दी पत्रक दिनांक : ०६/०१/२०२४

**सेवानिवृत्त मुख्य लिपिक श्री सुर्यकांत कावळे यांची २३,५७,०८६/— रूपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (४३.३७ %) निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे अपसंपदेचा गुन्हा दाखल**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे. भाग्यनगर जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं. ०५/२०२४ कलम १३(१)(ई), १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ आणि कलम १०९ भा.दं.वि. |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०५.०१.२०२४ रोजी ०८.४४ वा. |
| तक्रारदार यांचे नाव | श्री. कालीदास प्रभाकर ढवळे, पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १. सुर्यकांत रूक्माजी कावळे, वय ६० वर्षे, सध्या सेवानिवृत्त, तत्कालीन मुख्य लिपिक (वर्ग —३), श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माणिक नगर, नांदेड.<br>२. सौ.मिना भ्र. सुर्यकांत कावळे, वय ५१ वर्षे, व्यवसाय — गृहीणी व शिवणकाम, दोघे रा. संकेतनगर, भावसार चौक, तरोडा (खु) ता.जि. नांदेड |
| निरीक्षण कालावधी | दिनांक ०१.०६.१९९९ ते दिनांक ०७.०४.२०१८ |
| अपसंपदा रक्कम | २३,५७,०८६/— रुपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (कायदेशिर उत्पन्नाचे तुलनेत ४३.३७ %) |
| थोडक्यात माहिती | यातील लोकसेवक सुर्यकांत रूक्माजी कावळे, सध्या सेवानिवृत्त मुख्य लिपिक (वर्ग—३) यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. लोकसेवक यांनी संपादित केलेली मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केली किंवा कसे याबाबत त्यांना वेळोवेळी संधी देवून माहिती घेण्यात आली होती. परंतु त्यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत ते पुष्टीदायक पुरावे सादर करू शकले नाहीत. त्यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त किंमतीची मालमत्ता स्वत:चे नावे, पत्नी मिना सुर्यकांत कावळे यांच्या नावे संपादित केल्याचे उघड चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. त्यांनी संपादित केलेली रू. २३,५७,०८६/— किंमतीची बेहिशोबी मालमत्ता ही त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या तुलनेत ४३.३७ % जास्त असल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले आहे.<br>सदर विसंगत बेहिशोबी मालमत्ता संपादित करण्यासाठी लोकसेवक सुर्यकांत रूक्माजी कावळे यांना त्यांची पत्नी सौ. मिना सुर्यकांत कावळे यांनी मदत करून गुन्हयास प्रोत्साहित करून अपप्रेरणा दिली आहे. म्हणून त्या दोघांचे विरूध्द वरील प्रमाणे अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>सुर्यकांत रूक्माजी कावळे यांचे संकेत नगर, नांदेड येथील घराचे घरझडती घेतली असता एकूण १०२ तोळे सोने (१किलो २० ग्रॅम), ६९ तोळे चांदी (६९० ग्रॅम) व नगदी रु. ५९,०६,५००/— (एकोणसाठ लाख सहा हजार पाचशे रुपये) रोख रक्कम मिळून आली आहे. |
| मार्गदर्शक | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. अरविंदकुमार हिंगोले पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.



| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_naned | |



कार्यालय पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner